जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०३/१२/२०२३
## दि.०२/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८२६/२०२३,भादविक ४२७,३५२,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१) १३५,आर्म ॲक्ट ४(२५), क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४२ वर्षे,रा.शांती हाईट्स,सासवड रोड,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०१/१२/२०२३ रोजी १९/०० ते १९/१५ वा.चे दरम्यान कानिफनाथ अमृततुल्य हॉटेल पीएमटी बस डेपो शेजारी,ढमाळवाडी,भेकराईनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील सन-२०२१ मध्ये पापडे वस्ती येथे नमुद दोन अनोळखी इसमांनी कानिफनाथ अमृत तुल्य हॉटेल मध्ये येवुन,माझ्यावर मर्डरचा गुन्हा दाखल झाला होता,त्यावेळी तु पोलीसांना मदत करत होता ना,आता मी सुटुन आलो आहे,आता तुला दाखवतो असे बोलुन,फिर्यादी यांचे हॉटेल मधील खुर्च्या,टेबल फेकुन देवुन,हॉटेल मधील काऊंटरची काच फोडुन,त्यांच्या हाता तील लोखंडी धारदार शस्त्रे हवेत फिरवुन,फिर्यादी यांच्या अंगावर धावुन येवुन,त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच त्यांचे हातातील धारदार शस्त्रे हवेत फिरवुन,मी आताच मर्डर मधुन बाहेर आलोय,जो कोणी माझ्याविरुध्द पोलीसांत तक्रार करेल,त्याचा मी गेम करेन अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सुशिल डमरे ८८८८८५७४२४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४८८ /२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६० वर्षे,रा.वारजे,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२०२३ सकाळी ०६/१० वा.ते ०६/२० वा.चे विनायक हॉस्पिटल वारजे,पुणे समोरील सर्व्हिस रोडकडील फुटपाथवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया सर्व्हिस रोडकडील फुटपाथवर प्रभातफेरी मारत असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ३०,०००/- रू किमतीची जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मुंढे ९४०३७३८५८९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे १२१/२०२३,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | राहुल तागुंदे,वय-३२ वर्षे,रा.खडकवाडी,पो.मांडवी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिंनाक ३०/११/२०२३ रोजी ०९/३० ते दि.०१/१२/२०२३ २०/३० वा.चे दरम्यान एन.डी.ए.रोड, शिवणे,पुणे येथे निलेश दुधाने यांचा गाळा नं.४,व्यंकटेश इलेक्ट्रिक सामानाचे रिटेल व होलसेल विक्रीचे दुकानात |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे व्यंकटेश इलेक्ट्रिक दुकान कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने व्यंकटेश इलेक्ट्रीकल्स दुकानाचे मागील बाजुचा लोखंडी पत्रा उघडुन,त्यावाटे आत मध्ये प्रवेश करुन,ड्रॉव्हर कशाचेतरी सहाय्याने उचकटुन,त्यामध्ये ठेवलेले २,५००/- रूपये रोख रक्कम,पॉलीकॅब,टि.व्ही. केबल व कॅटसिक्स कंपनीचे वायरचे बंडल असा एकुण ३,०७,४२०/- रु किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमेश रोकडे ७०२१६३६७४९ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५८८/२०२३,भादविक २७९,३३७,३३८,४२७,मो.वा.का.कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | रियाज अन्सारी,वय-५३ वर्षे,रा.पारगेनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात मोटार सायकलस्वार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२०२३ रोजी १७/३० वा.स्वामीनारायण मंदिराच्या पुढे भुमकर ब्रिजवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह महाबळेश्वर येथुन कारने पुण्याला येत असताना कात्रज नविन बोगदा पास करुन स्वामीनारायण मंदिराच्या पुढे भुमकर ब्रिजवर आले असताना,एका कंटेनरवरील चालकाने,त्याचे ताब्यातील कंटेनर हा भरधाव वेगाने,हयगयीने,बेदरकारपणे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवुन हायवे रोडवर मुंबईकडे जाणाऱ्या लेन नं.१ वर काम करीत असलेला पिक-अप,तसेच रोडने जाणाऱ्या शिवशाही बस,हायवा डंपरला धडक देऊन,त्या वाहनाची धडक फिर्यादी यांचे कारला बसुन,फिर्यादी व त्यांची पत्नी कुलसुम रियाज अन्सारी,वय-४८ वर्षे तसेच पिकअप मधील इसम सुमित सुभाष मौर्य,वय-१८ वर्षे,रा.साई मंदिरा शेजारी,नवले ब्रिज,पुणे यास तसेच हायवा डंपर वरील चालक प्रविण वालजीभाई वाडर,वय-३० वर्षे,रा.शिवनगर,सुतारवाडी,पाषाण,पुणे यांना गंभीर जखमी करून,पिकअप गाडी,हायवा डंपर,शिवशाही गाडी व कार या वाहनांना धडक देऊन,सदर वाहनांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, यादव ९५५२१६०७२० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५५४/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६८ वर्षे,रा.जय भवानीनगर,वडगाव-शेरी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/११/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. ते ०९/०० वा.चे दरम्यान पुणे मनपा शिवाजीनगर ते सिध्दीविनायक मंदिर,वडगाव-शेरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह मनपा पीएमपीएमएल बसने पुणे मनपा शिवाजीनगर ते सिध्दीविनायक मंदिर,वडगाव-शेरी,पुणे असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांची पत्नी हिची नजर चुकवुन,त्यांचे जवळील पर्सची चेन उघडुन,त्यामधील सोन्याचे दागिने २,६०,०००/- रु किमतीचे चोरी करून नेले आहे. (फिर्यादी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, माने ७३५०७७८१०० |

## <u>दि.०३/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २८९/२०२३,भादविक ३०७,१२०(ब),३४,क्रिमी.लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | मनोज मेहता,वय-३९ वर्षे,रा.कॉन्वेन्ट स्ट्रिट,कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/१२/२०२३ रोजी २१/१५ वा.स्टेप इन कापड दुकानात,सेंटर स्ट्रिट रोड,कॅम्प पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे भाऊ विजय विमलचंद मेहता,वय-३८ वर्षे,युनिर्व्हसल अपार्टमेंट,इस्ट स्ट्रिट,कॅम्प,पुणे यांना दोन अनोळखी इसमांनी जीवे मारण्याचा कट रचुन,त्यांच्या हाता मध्ये कोणतेतरी धारदार हत्यार घेवुन येवुन,भोपळे चौक येथुन पाठलाग करत स्टेप इन कापडाचे दुकानात येवुन,विजय मेहता यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,त्यांचेवर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी हाता मध्ये धारदार शस्त्रे घेवुन सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), श्रीमती.पियंका शेळके |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**